आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
५ जानेवारी २०२६ - सोमवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- ‘समुद्र प्रताप’ युद्धनौका भारतीय तटरक्षक दलाच्या ताफ्यात दाखल

- युनिव्हर्सल म्युझिक ग्रुप आणि एक्सेल एंटरटेनमेंट यांच्यामध्ये धोरणात्मक भागीदारी कराराची मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत घोषणा

- महानगरपालिका निवडणुकीत उमेदवारांच्या बिनविरोध निवडीवरून सत्ताधारी आणि विरोधकांमधे आरोप-प्रत्यारोप

**आणि**

- आगामी आयपीएल स्पर्धेच्या प्रसारणावर बांगलादेशाकडून अनिश्चित काळासाठी बंदी

**<><><><><>**

देशातली पहिली स्वदेशी बनावटीची प्रदूषण नियंत्रक ‘समुद्र प्रताप’ युद्धनौका भारतीय तटरक्षक दलाच्या ताफ्यात आज गोवा इथं दाखल झाली. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यावेळी उपस्थित होते. ही युद्धनौका सागरी प्रदूषण नियंत्रण नियमन, सागरी कायदा अंमलबजावणी, बचाव आणि शोध मोहीम राबवण्यात उपयोगी पडेल. ही युद्धनौका देशाचा सामूहिक दृढनिश्चय आणि आत्मविश्वास यांचं प्रतीक असल्याचं सरंक्षण मंत्री यावेळी म्हणाले. सागरी जैवविविधतेचं संरक्षण करणं हे नैतिक जबाबदारी आहे, हे जहाज प्रवाळ खडक आणि समुद्री जिवांचं रक्षण करेल, असं ते म्हणाले.

- **- होल्ड बाईट राजनाथ - -**

नौदलाच्या ताफ्यात समुद्र प्रताप युद्धनौका समाविष्ट झाल्यामुळे भारतीय तटरक्षक दलाची क्षमता वाढणार असून सागरी सुरक्षा, पर्यावरण सरंक्षण आणि स्वदेशीच्या संकल्पनेला चालना मिळणार आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली गेल्या वर्षी पार पडलेल्या वेव्ज परिषदेत संगीत आणि कला क्षेत्रातल्या अनेक नवीन आंतरराष्ट्रीय प्रकल्पांची बीजे रोवली गेली होती, त्याचा परिणाम म्हणून आज संगीत क्षेत्रातला जागतिक पातळीवरचा पहिला

करार मुंबईत होत असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. युनिव्हर्सल म्युझिक ग्रुप आणि एक्सेल एंटरटेनमेंट यांच्यामध्ये आज मुंबईत धोरणात्मक भागीदारी कराराची घोषणा करण्यात आली त्यावेळी ते बोलत होते. नव्या पिढीच्या प्रेक्षकांना आकर्षित करणाऱ्या चित्रपट, संगीत, ओटीटी, गेमिंग इत्यादींच्या निर्मितीसाठी महाराष्ट्र आणि मुंबई हे केंद्र होतंच परंतु सरकारच्या व्यवसायसुलभतेच्या धोरणामुळे इथली आशयनिर्मितीची गुणवत्ता आणि क्षमता वाढली आहे, त्यामुळे कलाक्षेत्रात आपला ठसा उमटवण्याची इच्छा असलेल्या जगभरातल्या सर्व निर्मात्यांचं महाराष्ट्रात आणि मुंबईत स्वागत आहे, असं फडणवीस यावेळी म्हणाले.

यावेळी एक्सेल एंटरटेनमेंटचे संस्थापक फरहान अख्तर, युनिव्हर्सल म्युझिक ग्रुपचे कार्यकारी उपाध्यक्ष ॲडम ग्रॅनाइट, गीतकार आणि पटकथा लेखक जावेद अख्तर, तसंच इतर मान्यवर उपस्थित होते.

<><><><>

महानगरपालिका निवडणुकीत महायुतीने आपले उमेदवार बिनविरोध निवडून आणल्याचा काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी निषेध केला. हे उमेदवार लोकप्रिय आहेत, म्हणून बिनविरोध निवडलेले नसून पैसा आणि धाकदपटशाच्या जोरावर झालेले आहेत, अशी टीका सपकाळ यांनी केली आहे. मुंबईत पत्रकार परिषदेत ते बोलत होते.

विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांच्या कार्यालयात कार्यरत असलेले बहुतांश अधिकारी हे भ्रष्ट असल्याचा आरोपही सपकाळ यांनी केला. या संदर्भातला अहवाल मिळूनही निवडणूक आयोगाने कुठलीही कारवाई केलेली नाही, त्यामुळे या संदर्भात कारवाई करावी अशी मागणी त्यांनी केली.

<><><><>

बिनविरोध होत असलेल्या निवडणुका लोकशाहीसाठी चांगल्या असल्याचं मत भाजपा नेते आणि मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केलं आहे. बिनविरोध निवडणूक होऊ नये असं कुठल्याही कायद्यात लिहिलेलं नाही, निवडणूक आयोगाची याला परवानगी आहे याकडे त्यांनी लक्ष वेधले. छत्रपती संभाजीनगर विमानतळावर ते वार्ताहरांशी बोलत होते. बिनविरोध निवडणुकांना विरोध करणाऱ्यांनी योग्य व्यासपीठावर न्याय मागावं असं आवाहन त्यांनी केलं.

<><><><>

ठाण्यासह इतर महापालिका निवडणुकांमध्ये बिनविरोध निवडून आलेल्यांच्या निवडीला स्थगिती देण्याची आणि या प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी मनसेनं राज्य निवडणूक आयोगाकडे केली आहे. मनसे नेते अविनाश जाधव यांनी निवडणूक आयोगाला यासंदर्भात पत्र दिलं आहे. पैसे देऊन विरोधी उमेदवारांचे अर्ज मागे घेण्यात आले किंवा अवैध मार्गाने त्यांचे अर्ज बाद ठरवल्याचा आरोप मनसेनं केला आहे.

<><><><>

ठाणे महानगरपालिका निवडणुकीत अर्ज मागे घेणाऱ्या शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या तीन उमेदवारांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी माजी खासदार राजन विचारे आणि मनसे नेते अविनाश जाधव यांनी ठाणे पोलिसांकडे केली आहे. यावर निवडणूक आयोगाकडून अहवाल आल्यानंतर कारवाई करू असं पोलिसांनी सांगितलं.

सत्ताधाऱ्यांनी सरकारी अधिकाऱ्यांना हाताशी धरून तसंच, पैशांचं आमिष दाखवून या तिघांना उमेदवारी अर्ज मागे घेण्यास भाग पाडल्याचा आरोप विचारे आणि जाधव यांनी केला आहे.

<><><><>

मुंबई उच्च न्यायालयाच्या कर्मचाऱ्यांना निवडणुकीचं काम देण्याचा आपला निर्णय चुकल्याचं बृहन्मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त भूषण गगराणी यांनी मान्य केलं आहे. मुंबई उच्च न्यायालयाने या प्रकरणाची दखल घेत आयुक्तांनी आपलं कार्यक्षेत्र ओलांडल्याचं निरीक्षण नोंदवलं आहे. आयुक्तांनी निवडणुकीच्या कामासाठी कर्मचाऱ्यांची व्यवस्था इतर ठिकाणांहून करावी असं उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती श्री चंद्रशेखर आणि न्यायमूर्ती गौतम आंखड यांच्या पीठाने म्हटलं आहे. या प्रकरणाची पुढील सुनावणी निवडणुकींनंतर करण्यात येईल असं न्यायालयाने म्हटलं आहे.

<><><><>

भारतातील इलेक्ट्रॉनिक्स उत्पादन गेल्या ११ वर्षांमध्ये सहा पटींनी वाढलं असून निर्यात आठ पट वाढली असल्याचं इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी समाजमाध्यमवरच्या आपल्या संदेशात म्हटलं आहे. गेल्या वर्षभरात फक्त ॲपल कंपनीनेच ५ हजार कोटी मूल्याचे मोबाईल फोन निर्यात केले होते असं त्यांनी पुढे म्हटलं.

या वर्षभरात देशात ४ नवे इलेक्ट्रॉनिक्स कारखाने सुरु होणार आहेत. सध्या या क्षेत्रात २५ लाख रोजगार उपलब्ध असून काही कंपन्यांची एका कारखान्यात ४० हजारपर्यंत नोकऱ्या देण्याची क्षमता आहे, असं त्यांनी सांगितलं.

<><><><>

IRCTC घोटाळ्यात राजद नेते लालू प्रसाद यादव यांच्याविरुद्धच्या खटल्याला स्थगिती द्यायला आज दिल्ली उच्च न्यायालयाने नकार दिला. तसंच, या प्रकरणी केंद्रीय अन्वेषण विभागाला उत्तर सादर करण्याचे आदेश दिले. आपल्या विरुद्ध झालेल्या आरोपनिश्चितीला आव्हान देणाऱ्या यादव यांच्या याचिकेवर आज दिल्ली उच्च न्यायालयात सुनावणी झाली. या प्रकरणाची पुढची सुनावणी येत्या १४ तारखेला होणार आहे. गेल्यावर्षी ऑक्टोबर महिन्यात लालू प्रसाद यादव यांच्यासह त्यांची पत्नी राबडीदेवी, मुलगा तेजस्वी आणि इतर ११ जणांविरुद्ध फसवणूक, गुन्हेगारी कट रचणं आणि भ्रष्टाचाराच्या खटल्यात आरोप निश्चित करण्यात आले होते.

<><><><>

२०२० च्या दिल्ली दंग्याप्रकरणी अटकेत असलेला विद्यार्थी नेता उमर खालीद आणि शरजील इमाम यांचा जामीन सर्वोच्च न्यायालयाने फेटाळला आहे. या दोघांना प्रथमदर्शनी यूएपीए अर्थात बेकायदेशीर कारवाई प्रतिबंधक कायद्या अंतर्गत अटक झाली असल्याचं कारण न्यायालयाने दिलं. दुसरीकडे याच खटल्यातील आरोपी गुलफीशा फातीमा, मीरन हैदर, शिफा उर रहमान, सलीम खान आणि शादाब अहमद यांना न्यायमूर्ती अरविंद कुमार आणि न्यायमूर्ती एन. व्ही. अंजारीया यांच्या खंडपीठाने जामीन मंजूर केला.

<><><><>

बांगलादेशनं आगामी आयपीएल स्पर्धेच्या प्रसारणावर अनिश्चित काळासाठी बंदी घातली आहे. कोलकाता नाईट रायडर्समधून बांगलादेशचा जलदगती गोलंदाज मुस्तफिजूर रहमान याला वगळल्यानंतर बांगलादेशनं हा निर्णय घेतला. रहमान याला संघाबाहेर काढायचा निर्णय बीसीसीआयच्या निर्देशांनुसार घेतला असून त्यामागे कोणतंही तार्किक कारण नव्हतं. याचे तीव्र पडसाद बांगलादेशच्या जनतेत उमटत असून त्यामुळे आयपीएलच्या प्रसारणावर बंदी घातल्याचं बांगलादेश सरकारच्या आदेशात म्हटलं आहे.

<><><><>

ग्रामीण रोजगारासाठीचा मनरेगा कायदा रद्द करून नवीन व्ही बी जी राम जी ही योजना केंद्र सरकारने लागू केली आहे. ग्रामीण भागातही या योजनेचं स्वागत होत आहे. यवतमाळ जिल्ह्यातल्या शिवनी गावाचे सरपंच सचिन दोंदल यांनी आकाशवाणीकडे आपली प्रतिक्रिया दिली.

**- होल्ड बाईट सचिन - -**

**<><><><><>**

धुळे इथल्या गुरुद्वारात झालेला वाद चिघळून काल रात्री दोन गटांत दगडफेक झाली. धुळ्यातल्या गुरुद्वाराचे प्रमुख धर्मगुरू बाबा धीरजसिंह यांची डिसेंबर महिन्यात हत्या झाली होती. त्यानंतर रिकाम्या झालेल्या गुरुद्वारा प्रमुखपदासाठी दोन गटांत वाद उफाळला. याच वादातून रविवारी गुरुद्वाराच्या प्रवेशद्वाराला कुलूप लावल्यावरून या तणावाला सुरुवात झाली होती. या प्रकरणी पोलिसांनी जवळपास १५ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

**<><><><><>**

देशभरात आज राष्ट्रीय पक्षी दिन साजरा केला जात आहे. पक्षी हे केवळ निसर्गाचं सौंदर्य वाढवणारे घटक नसून, ते संपूर्ण परिसंस्थेचा अविभाज्य भाग आहेत, याची जाणीव करून देण्यासाठी हा दिवस दरवर्षी पाळला जातो. पक्ष्यांचं संरक्षण करणं, त्यांच्या नैसर्गिक अधिवासाचं जतन करणं आणि निसर्गातील समतोल कायम राखणं, हा या दिवसाचा मुख्य उद्देश आहे.

**//<><><><><>//**